PUNEMETROPOLIS

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune metropolitan Regional Development Authority, Pune**

स.नं. १५२ - १५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे - ४११००७.

S.No. 152 - 153, Maharaja Sayajirao Gaikwad Udyog Bhawan, Aundh, Pune – 411007

Ph No: 020 - 259 33 344 / 356 / 333 / फोन नं. : ०२० - २५९ ३३ ३४४ / ३५६ / ३३३ Email :hqpmrda@gmail.com

## भागश: भोगवटा प्रमाणपत्र

( मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.7.6 नुसार )

जा.क्र : DP/बीएचए/मौ.लोहगाव/ता.हवेली/जि.पुणे/स.नं.२९७/१/प्र.क्र.-२०३४ / १६-१७ दि.२०/८ /२०१७

प्रति,

मे. प्रणाम असोसिएट्स तर्फे
श्री विजय नामदेव मोझे व इतर
पत्ता - मौ लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे.

मौजे - लोहगांव, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे येथील स. नं. २९७/१, क्षेत्र - १००००.०० चौ. मी. या जागेवर इमारतीचे सुधारित बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकारी आदेश क्र.- पमह/एनए/एसआर/२८/१३, दिनांक - ३/१/२०१४, पी.एम.आर.डी.ए./प्र.क्र.BHA/४६७/लोहगाव/ता.हवेली/पुणे, दि. - २४/६/२०१६ व प्राधिकरणाकडील DP/बीएचए/मौ.लोहगांव/ता.हवेली/जि.पुणे/स.नं.२९७/१/प्र.क्र.२०३४/१६-१७,दि.-२३/८/२०१७ अन्वये आपणास परवानगी देण्यात आली आहे.

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण श्री. अतित अदमुलवार लायसन्स नं. CA/२००८/४१८८७ परवानाधारक वास्तुविशारद यांच्या देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम भागश: केले असलेबाबत व या इमारतींना भागश: भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत दि - २०/७/२०१७ रोजी अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना सोबतच्या परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केलेले अटींस अधिन राहून भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे .

उपयोगात आणावयाच्या इमारतीचे वर्णन

1) मंजूर नकाशातील इमारत क्र. B पार्किंग + ८ मजले ( सदनिका - ६४ )
2) मंजूर नकाशातील इमारत क्र C पार्किंग + ९ मजले (सदनिका - ७१)

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune ★ PMRDA

महानगर आयुक्त,
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता.

प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

1. ग्रामसेवक, मौजे- लोहगांव, ता - हवेली, जि - पुणे यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि-२०/८ /२०१७ रोजीचे पत्र क्र.२०२५/१६-५८ सोबतचे

परिशिष्ट 'ब'

1) अर्जदार / सदनिका धारक / गाळे धारक यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

2) अर्जदार / सदनिका धारक यांना सदनिका लगतचा दोन मजले उंचीचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

3) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

4) उंच इमारतींच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकाचे मुख्य अग्नीशमन अधिकारी यांनी पत्र.क्र. FB/१७६४, दि-२८/०७/२०१७ अन्वये दिलेल्या अग्नीशमन नाहरकत प्रमाणपत्रातील अटीं व शर्तीची पुर्तता करणे अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील.

5) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र. ७.१ नुसार सदर प्रकल्पाचे बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार करणेची तसेच भारतीय प्रमाणकानुसार सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करुन नियोजित बांधकाम करणेची संपूर्ण जबाबदारी जमिनमालक / विकासक यांची असून प्रस्तुत प्रकरणी अर्जदार / जमीन मालक / विकासक श्री विजय नामदेव मोझे यांनी दि. – ०७/०७/२०१७ रोजी रुपये - ५००/- स्टॅम्प पेपरवर तसे नोटराईज्ड् हमीपत्र क्र. – २०७१/२०१७ सादर केलेले आहे. त्यास अधिन राहून भागश: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

6) प्रस्तुत गृहप्रकल्पाकरिता आपण सादर केलेल्या प्रमाणपत्रात नमूद सक्षम प्राधिकरणाने / ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहप्रकल्पातील सदनिका हस्तांतरणापूर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार / जमीन मालक / विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

7) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शूल्क, प्रिमीयम शूल्क, विकास शूल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune
PMRDA

महानगर आयुक्त,
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता.